**शासकीय तंत्रनिकेतन, पेण**
**रामवाडी, शिवाजीनगर, पेण, जिल्हा रायगड 402107.**
☎ (02143) 253389, 257081 Fax: (02143) 253389,
e-mail:governmentpolytechnicpen@rediffmail.com

जा.क्र.शातंनिपेण/विवि/0129/ दिनांक :-13/06/2018

**शैक्षणिक वर्ष 2018 -19 व्दितीय व तृतीय वर्षाच्या प्रवेशाबाबत..**

संस्थेतील सर्व विदयार्थ्यांना या सूचनेअन्वये कळविण्यात येते की, शैक्षणिक वर्ष 2018-19 मधील **व्दितीय व तृतीय वर्षाच्या** प्रवेश अर्ज आपआपल्या विभागातील विभागप्रमुख यांच्याकडून प्रवेशास पात्र असल्याबाबतचे **अर्ज दि.18/06/2018 ते 19/06/2018** पर्यत तपासून घेण्यात यावेत. तसेच विभागप्रमुखांच्या स्वाक्षरी नंतर सदर विद्यार्थ्याचा प्रवेश निश्चित करुन अर्ज कार्यालयातील **श्री.नितिन लवटे** यांच्याकडे प्रवेश फी च्या तपशिला करीता देण्यात यावेत. नंतर सदरचे प्रवेश अर्ज शुल्क भरण्यासाठी विद्यार्थ्यांनी पुढील सूचने प्रमाणे Axis बँकेतील कर्मचारी या संस्थेत येऊन विदयार्थी ग्राहकभांडारमध्ये जमा करावयाचे आहे. त्यानंतरच विद्यार्थ्याचा प्रवेश निश्चित होईल. प्रवेश घेणे व प्रवेश शुल्क भरणे ची शेवटची तारीख दिनांक **02/07/2018** आहे. या तारखेनंतर प्रवेशाकरिता येणा-या विद्यार्थ्याची जबाबदारी स्वत:ची राहील याची सर्व विद्यार्थ्यांनी नोंद घ्यावी.

जे विद्यार्थी मागासवर्गीय संवर्गातील (SC,OBC,SBC,VJNT & ST) आहेत त्यांनी अर्जासोबत खालील प्रमाणे कागदपत्रे जोडावीत. अर्जासोबत अपूर्ण कागदपत्र असलेल्या विद्यार्थ्यांना सवलतीमध्ये प्रवेश दिला जाणार नाही.

1. प्रवेश अर्ज ठळक अक्षरात पूर्ण भरणे व पालक व विद्यार्थ्यांची सही आवश्यक.
2. मागील वर्षाची गूणपत्रके (Marksheets)
3. जातीचा दाखला
4. जातवैधता प्रमाणपत्र (Caste Validity) शिष्यवृत्ती/फिसवलतीसाठी सक्तीचे आहे.
5. नॉन क्रिमिलेअर प्रमाणपत्र.
6. उत्पन्नाचा दाखला (सन 2017-18 या वार्षिक वर्षाचे तहसिल कार्यालयामधील )
7. अनुसूचित जमाती (ST) च्या विद्यार्थ्यांनी अर्जासोबत जातवैधता (Caste Vlidity Certificate) प्रमाणपत्र जोडणे सक्तीचे आहे. अन्यथा आपणांस पूर्ण फी भरावी लागेल.
8. सर्व कागदपत्र साक्षांकित (Atestted) करणे आवश्यक आहे.
9. आधार कार्डची छायाकींत प्रत.
10. रेशन कार्डची छायाकींत प्रत.

प्राचार्य
शासकीय तंत्रनिकेतन पेण

प्रत:- 1. सूचना फलक शासकीय तंत्रनिकेतन पेण
2. सर्व विभागप्रमुख स्थापत्य/ रासायनिक/ संगणक तंत्रशास्त्र/ उपकरणीकरण व नियंत्रण/ यंत्र अभि. यांनी वरील प्रमाणे कार्यवाही करुन विद्यार्थ्यांना सूचित करावे.